# विद्यापीठात आजपासून 'उद्योग मेळावा'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग आणि एमएसएमई टेक्नॉलॉजी डेव्हलपमेंट सेंटर यांच्यातर्फे आज, बुधवारी आणि गुरुवारी (दि. २८) विद्यापीठात उद्योग मेळावा होणार आहे. लोककला केंद्रातील या मेळाव्यात ट्रेड फेअर, राष्ट्रीय परिसंवाद, जागरुकता शिबिर यांचा समावेश आहे. बाजारात नवीन प्रवेश करणारे उपक्रम, तांत्रिक विकास झालेले क्षेत्रांचे धोरण, त्याबद्दलची जागरुकता, माहिती व प्रचार करणे या उद्देशाने हा मेळावा आहे. त्यामध्ये ६५ उद्योगांनी सहभाग नोंदविला आहे.

# डॉ. राजेंद्रसिंह राणा यांचे आज व्याख्यान

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ व असोसिएशन ऑफ आर्किटेक्टस अॅन्ड इंजिनिअर्स यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागे व्हा, पंचगंगेसाठी' या अभियानाअंतर्गत आंतरराष्ट्रीय जल दिनानिमित्त बुधवार (दि. २७) रोजी सकाळी १०.३० वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात डॉ. राजेंद्रसिंह राणा यांचे विशेष व्याख्यान होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असणार आहेत. याप्रसंगी महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल यांची प्रमुख उपस्थित असणार आहे. डॉ. राणा व्याख्यानातून जयंती नाला व पर्यायाने पंचगंगेचे प्रदूषण रोखण्यासाठी ते उपाय योजना सुचविणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. पी. डी. राऊत व असोसिएशन ऑफ आर्किटेक्टस अॅन्ड इंजिनिअर्सचे अध्यक्ष अजय कोराणे यांनी केले आहे.

# भगवान महावीर अध्यासन केंद्रातर्फे आजपासून राष्ट्रीय परिषदेस प्रारंभ

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ भगवान महावीर अध्यासन केंद्रातर्फे 'भगवान महावीर व महात्मा गांधी यांच्या विचारांची सध्यकालीन आवश्यकता' या विषयावर दि. २७ व २८ मार्च रोजी राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. दक्षिण भारत जैन सभेचे अध्यक्ष रावसाहेब पाटील यांच्याहस्ते परिषदेचे उद्‌घाटन होणार आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी असतील. उद्योजक सुरेंद्र जैन, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. व्ही. बी. ककडे यांनी केले आहे.

# विद्यापीठात आजपासून 'उदयम समागम'

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभाग आणि 'एमएसएमई' टेक्नॉलॉजी डेव्हलपमेंट सेंटर मिनिस्ट्री ऑफ एमएसएमई, आग्रा यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २७ व २८ मार्च रोजी विद्यापीठाच्या लोककला केंद्र येथे 'उदयम समागम' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमासाठी ६५ युनिट्सने उत्पादन सेवेच्या स्टॉल प्रदर्शनासाठी नोंदणी केलेली असून यामध्ये फाऊंड्री व सहभागी क्षेत्रांचा समावेश आहे. एससी व एसटी व महिला प्रवर्गामधून २० उद्योजक उत्पादन सेवेचे प्रदर्शन करणार आहेत. दोन दिवसांच्या कालावधीत राष्ट्रीय सेमिनार व जागरूकता शिबिरामधून औद्योगिक व तांत्रिक क्षेत्राबाबत मार्गदर्शन मिळणार आहे.

# बी.एड., एम.एड. एकात्मिक अभ्यासक्रमाची केंद्रीय प्रवेश प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** महाराष्ट्र शासनाच्या वतीने २२ मे रोजी घेण्यात येणाऱ्या बी.एड., एम.एड.(एकात्मिक) तीन वर्षे अभ्यासक्रमाची केद्रीय सामायिक प्रवेश प्रक्रिया २०१९-२०ची ऑनलाईन नोंदणी सुरु झाली आहे. पदव्युत्तर पदवी प्राप्त अथवा पदव्युत्तर परीक्षेच्या (एम.ए./एम.एस्सी) शेवटच्या वर्षाला बसलेले विद्यार्थी http:mahacet.Org या संकेतस्थळावरून दि.२३ एप्रिलपर्यंत प्रवेश प्रक्रियेची नोंदणी करू शकतील. बी.एड. एम.एड. (एकात्मिक) प्रवेश प्रक्रिया संदर्भात एक दिवसाची मोफत उद्‌बोधन कार्यशाळा दि.१३ एप्रिल रोजी शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात आयोजित करण्यात आली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी अधिविभागात संपर्क साधावा, असे आवाहन डॉ.पी. एस. पाटणकर यांनी केले आहे.

# विद्यापीठ क्रीडा अधिविभागातर्फे शुक्रवारी खेळाडूंचा गुणगौरव समारंभ

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ क्रीडा अधिविभागाच्या वतीने २०१७-१८ मध्ये अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत प्रावीण्य मिळविलेल्या खेळाडूंचा गुणगौरव समारंभ शुक्रवार (दि.२९) रोजी सकाळी ११.३० वाजता मानव्यशास्त्र इमारत सभागृह येथे आयोजित करण्यात आला आहे. समारंभास आंतरराष्ट्रीय नेमबाज खेळाडू गिरीजा संदीप पाटील-देसाई या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असतील. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, क्रीडा व शारीरिक शिक्षण प्र-संचालक उपस्थित राहणार आहेत.

# भविष्याचा वेध घेण्याची व्यापक दृष्टी ठेवा : भोईटे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

जगाचा परीघ अथांग सागरासारखा आहे. यामध्ये ज्ञानाचा खजिना असून तो लुटण्यासाठी स्पर्धा आहे. या स्पर्धेला सामोरे जाण्यासाठी आत्मविश्वासाची तसेच भविष्याचा वेध घेण्याची व्यापक दृष्टी असणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन डॉ. अशोक भोईटे यांनी केले. ते न्यू कॉलेज व आर्किटेक्चर कॉलेजच्या पहिल्या दीक्षांत समारंभात बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगचे चेअरमन डी. बी. पाटील होते.

दीक्षांत समारंभास शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागाचे अधिष्ठाता डॉ. ए. एस. गुरव यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी केले. परीक्षा विभागप्रमुख डॉ. बी. डी. गिरीगोसावी यांनी पदवी प्रदान करण्याची अनुमती निवेदनाने दिली.



**कोल्हापूर : न्यू कॉलेज आणि कॉलेज ऑफ आर्किटेक्चरच्या दीक्षांत समारंभात पदवी प्रदान करताना डॉ. अशोक भोईटे. सोबत डी. बी. पाटील, आर. एस. चरापले, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. व्ही. एम. पाटील. प्राचार्य एस. जी. दिगे, डॉ. बी. डी. गिरीगोसावी आदी.**

न्यू कॉलेज बी.एस्सी.मध्ये प्रथम प्रियांका जाधव, बी.ए.मध्ये द्वितीय स्वप्नाली व्हनाळकर, बी. कॉम.मध्ये तृतीय स्नेहल संकपाळ, शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता यादीत सहाव्या क्रमांकाने बीसीएसमध्ये विशेष प्रावीण्यप्राप्त हर्षदा चव्हाण, बीबीएमध्ये विद्यापीठ गुणवत्तामध्ये तिसऱ्या क्रमांकाने विशेष प्रावीण्यप्राप्त यामिनी वायंगणकर, बीसीए पूजा सुतार, बीई आर्किटेक्ट प्रतीक कुलकर्णी, एम आर्किटेक्ट श्रीधर कालवैभव अशा विशेष प्रावीण्यप्राप्त २३ स्नातकांना पदव्या प्रदान करण्यात आल्या. त्यानंतर ७०० स्नातकांना तसेच कॉलेज ऑफ आर्किटेक्चरच्या ३५ स्नातकांना पदव्या प्रदान करण्यात आल्या.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष एस. आर. चरापले, व्हा. चेअरमन आर. डी. पाटील, उपाध्यक्ष बी. जी. बोराडे, ए. बी. पाटील, ए. जी. वणिरे, के. जी. पाटील, आर. बी. पाटील, डी. जी. किल्लेदार, वाय. एल. खाडे, वाय. एस. चव्हाण, आर. डी.पाटील, डॉ. पी. के. पाटील, व्ही. एस. मोरे, प्रा. विनय पाटील, प्राचार्य सी. आर. गोडसे, सविता पाटील, सी. एस. गायकवाड, उदय पाटील आदी उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांचे आभार कॉलेज ऑफ आर्किटेक्चरचे प्राचार्य एस. जी. दिगे यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. के. ए. गगराणी, प्रा. एम. ए. नाईकवडी यांनी केले.

2 7 MAR 2019

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरूण भारत

# युवकांनी राष्ट्रकार्यास वाहून घ्यावे : डॉ. डी. आर. मोरे

प्रतिनिधी
गगनबावडा

राष्ट्राचे भवितव्य तेथील युवा पिढीवर अवलंबून असते हीच पिढी राष्ट्राचा कणा असते युवकांकडे मन, मेंदू, मनगट, हिंमत व ताकद असते या जोरावरच युवा शक्तीच राष्ट्राला आकार, विचार व नेतृत्व देऊ शकते आजच्या युवकांनी राष्ट्र कार्याला वाहून घ्यावे, असे आवाहन शिवाजी विदयापिठाचे शैक्षणिक सल्लागार डॉ.डी.आर. मोरे यांनी केले. यावेळी १५० विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.




**गगनबावडा : महाविद्यालयात शिक्षण सल्लागार आर. डी. मोरे. यांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्र वाटप करताना सोबत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सतिश देसाई सचिव विद्या देसाई व अन्य.**

गगनबावडा येथील पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव महाविद्यालयात आयोजित केलेल्या पहिल्या पदवीदान समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. आनंदी शिक्षण संस्थेचे संस्थापक प्रा. सतीश देसाई अध्यक्षस्थानी होते.

गगनबावडा सारख्या दुर्गम आणि डोंगराळ ठिकाणी आनंदी शिक्षण संस्थेने येथील मुलामुलींची केलेली शैक्षणिक सुविधा कौतुकास्पद असल्याचे प्रा.डी.आर. मोरे यांनी सांगितले.पदवीनंतर आपली शान वाढेल. अशी कामगिरी युवकांनी करावी, असे अवाहन त्यांनी केले.

शैक्षणिक, क्रिडा व सांस्कृतिक क्षेत्रात महाविदयालयाचा लौकिक वाढल्याचे प्रा. सतीश. देसाई यांनी सांगितले स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य एन.व्ही. शहा यांनी केले. विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास साधण्यासाठी महाविद्यालयात राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांचा त्यांनी आढावा घेतला. यावेळी गगनबावडा मुख्य शहर एस. टी. डेपो, पद्मश्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या मार्गावरून पदवीधर विद्यार्थी, मान्यवरांची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. कार्यक्रमास संस्थेच्या सचिव प्रा विद्या देसाई, माजी सभापती तानाजी पाटणकर, माजी सरपंच विश्वनाथ पोतदार, प्रा एस.एस. पानारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.डी.बी. भोसले तर आभार प्रा.आदिनाथ कांबळे यांनी मानले.

27 MAR 2019

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ज्येष्ठांना पीएच.डी.ची संधी स्वागतार्ह



शिवाजी विद्यापीठाच्या दिनांक १० मार्च २०१९ रोजी झालेल्या एका कार्यक्रमात विद्यापीठ अनुदान आयोगाचे (यु.जी.सी.) उपाध्यक्ष प्रा. डॉ. भूषण पटवर्धन यांनी देशातील जेष्ठ नागरिकांना ज्यांची इच्छा असेल त्यांना संशोधनाव्दारे पी.एच.डी. करणेसाठी सम्मिलित करुन घेणार आहोत, त्यादृष्टीने आमचा विचार चालू आहे असे वाचनात आले. जेष्ठ नागरिकांना पी.एच.डी. संधी मिळणार असेल, तर युजीसीचा होणार हा निर्णय स्वागतार्हःच म्हणावा लागेल, पी.एच.डी. करणेसाठी सद्याचे युजीसीचे नियम व अटी पहिल्यात तर फक्त अॅकेडेमीक विद्यार्थीच इंट्रास टेस्टव्दारे पात्र ठरु शकतात. सन २०१६ पूर्वीची जेष्ठांना इंट्रास टेस्ट न देणेची सवलत सन २०१७ पासुन युजीसीमधील विव्दानांनी रद्द केली. या पार्श्वभूीवर प्रा. डॉ. हेमंत पटवर्धन यांनी विद्यापीठातील कार्यक्रमात केलेले वक्तव्य अभिनंदनीय ठरते.

वास्तविक आपल्या देशात उच्चशिक्षित अनेकजण उद्योग क्षेत्रात, तसेच इतरत्र कार्यरत आहेत. अशा क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांना अनुभवाची शिदोरी पाठीशी असते. अशा लोकांमध्ये टॅलेंट उच्च दर्जाचे असते. यामधील मूलभूत संशोधनामध्ये गोडी असणारे, आपल्या नोकरी तसेच व्यवसायामधून निवृत्त झालेले अनेकजण असू शकतात. अशा लोकांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा मूलभूत संशोधनामध्ये उपयोग करुन घेतलेस त्याचा फायदा देशाला निश्चितच होईल.

आजपर्यंत पी.एच.डी. केलेल्या शिक्षण क्षेत्रातील अनेकांनी संशोधनात्मक प्रबंध विद्यापीठांना सादर केले आहेत. त्यामध्ये नाविस तर नुसतेच परंतू त्यांचे निर्षकांचा समाजास, देशासही काही फायदा नसतो. केवळ डॉक्टरेट मिळविणे व त्याव्दारे आर्थिक लाभ पदरात पाडून घेणे हाच हेतू असतो. आज पीएच.डी. निवड करताना मूलभूत संशोधनामध्ये काही भर पडणार आहे किंवा नाही, शोधप्रक्रियेव्दारे निघणाऱ्या निष्कर्षांचा समाजास तसेच देशास फायदा होणार आहे का नाही, हे विद्यापीठांनी तपासून पाहिले पाहिजे. याबाबतीत यूजीसीने अधिक लक्ष देणेची गरज आहे.

आपल्या देशात ज्ञानसंपदा विपूल प्रमाणात आहे. अनेकांनी परदेशात जाऊन वैद्यकीय, इंजिनियरिंग, बेसिक सायन्स या क्षेत्रात संशोधन करुन नाव कमविले आहे. आपल्या देशातील विद्यापीठे तसेच यूजीसीने मूलभूत संशोधनासाठी अग्रक्रम देऊन देशातील विपूल ज्ञान संपदेचा समाजास, देशास जास्तीत जास्त फायदा कसा होईल अशा प्रकारची धोरणे राबवावयास हवीत.

सद्याच्या पीएच.डी.च्या संदर्भातील यूजीसीच्या धोरणामध्ये आमुलाग्र सुधारणा होण्याची गरज आहे. उद्योग क्षेत्रात अनेकजण उच्च शिक्षित असतातच परंतु २५/३० वर्ष विशिष्ठ क्षेत्रात प्रत्यक्ष काम केलेमुळे अॅकेडेमीक विद्यार्थ्यांपेक्षा अनुभवाची ज्ञानसंपदा अधिक असते. अशा लोकांना यूजीसीने आवाहन करुन, पी.एच.डी.साठी जाचक अटी व नियम शिथिल करुन प्रसंगी आवश्यक असेल तर आर्थिक सहाय्य करुन त्यांना देशातील संशोधनाच्या प्रक्रियेत सामील करुन घेतलेस आपला देश आणखी प्रगतीपथावर जाईल हे निश्चित.

अरविंद राणे, कोल्हापूर
मो.नं. ९८९०३३३६९३

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 MAR 2019

तरूण भारत

# ग्रीन कॉलेज क्लीन कॉलेजमध्ये टेक्नॉलॉजी डिपार्टमेंटचे यश

**कोल्हापूर :** किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांतर्गत सुरू असलेल्या किर्लोस्कर वसुंधरा इको रेंजर्स या उपक्रमांतर्गत आयोजित ग्रीन कॉलेज क्लीन कॉलेज स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी ने प्रथम क्रमांक मिळवला आहे. राजाराम कॉलेज ने द्वितीय तर सायबर कॉलेजने तृतीय क्रमांक मिळवला आहे. किर्लोस्कर वसुंधरा इको रेंजर्स या उपक्रमांतर्गत १० कॉलेज निवडण्यात आली होती. तरुणांमध्ये पर्यावरण विषयक कृतिशीलता यावी म्हणून ग्रीन कॉलेज क्लीन कॉलेज ही स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये प्रत्येक कॉलेजमधील हवा, पाणी, ऊर्जा व जैवविविधता यांचे संवर्धन कसे करता येईल आणि प्रदूषण कसे रोखता येईल याविषयीचे सादरीकरण करण्याची स्पर्धा सायबर कॉलेजमध्ये पार पडली. यातील विजेत्या संघाला वसुंधरा क्लबचे वीरेंद्र चित्राव, सायबरचे डॉ. ए. आर. कुलकर्णी, मधुरा माने यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ राजेंद्र परिजात आणि मकरंद तावडे यांनी काम पाहिले. यावेळी डॉ. दीपक भोसले आणि शरद अजगेकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 MAR 2019
तरूण भारत

# जलपुरुष राजेंद्र सिंग यांचे आज व्याख्यान

कोल्हापूर : असोसिएशन ऑफ आर्किटेक्टस् अँड इंजिनिअर्सतर्फे 'जागे व्हा पंचगंगे'साठी या अभियाना अंतर्गत जलपुरुष डॉ. राजेंद्र सिंग यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले करण्यात आले आहे. बुधवार २७ रोजी शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी मनपाचे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद कोल्हापूर व शिवाजी विद्यापीठातील विविध विभाग प्रमुख उपस्थित असणार आहेत. तरी असोसिएशन ऑफ आर्किटेक्टस् अॅन्ड इंजिनिअर्सचे सभासद, शिवाजी विद्यापीठातील पर्यावरण, तंत्रशिक्षण व इतर विविध विभागातील विद्यार्थी व पर्यावरणप्रेमींनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन असोसिएशन ऑफ आर्किटेक्टस अॅन्ड इंजिनिअर्सच्या वतीने अध्यक्ष अजय कोराणे व शिवाजी विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

27 MAR 2019

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ज्ञानाच्या जोरावर संकटावर मात करा

## महेश काकडे यांचे प्रतिपादन: शिवाजी विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांचा पदवीदान समारंभ

प्रतिनिधी
कोल्हापूर

ज्ञानाच्या आधारावर जग जिंकता येते म्हणून ज्ञानाची शक्ती तुमच्याकडे असली पाहिजे. जगात वावरताना या ज्ञानासह मूल्यांचे वारकरी होवून येणाऱ्या संकटावर मात करा, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ संलग्न भारती विद्यापीठ इंजिनिअरिंग कॉलेज, फार्मसी कॉलेज, लॉ कॉलेज कोल्हापूर, लॉ कॉलेज कराड या महाविद्यालयांच्या संयुक्तिक पदवीदान समारंभात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. भारती विद्यापीठाचे विभागीय संचालक डॉ. एच. एम. कदम प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक काकडे म्हणाले,



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ संलग्न भारती विद्यापीठातील दीक्षांत समारंभात प्रमाणपत्र प्रदान करताना शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, सोबत भारती विद्यापीठाचे विभागीय संचालक डॉ. एच. एम. कदम, प्राचार्य डॉ. विजय घोरपडे, प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे, प्राचार्य डॉ. मंगला पाटील, प्राचार्य प्रा. उदय सावंत.

जागतिकीकरणात प्रतयेक्ष क्षेत्रात आव्हाने आहेत. ज्ञानाच्या जोरावर आणि तंत्रज्ञानाचा योग्य वापर करीत आव्हानांचा समाना केला पाहिजे. स्पर्धेत टिकण्यासाठी तुमच्याकडे कौशल्य असणे अतिशय महत्त्वाचे आहे.

पदवीदान समारंभात ४४ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. तर एकूण ४६१ स्नातकांना पदवी प्रमाणपत्रे देण्यात आली. प्रा. व्ही. टी. कोरीशेट्टी व प्रा. पी. एस. माळी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. ऐ. आर. किलुर यांनी आभार मानले. यावेळी प्राचार्य डॉ. विजय घोरपडे, प्राचार्य डॉ. मोरे, प्राचार्य डॉ. मंगला पाटील, प्राचार्य प्रा. उदय सावंत, विद्यार्थी उपस्थित होते.

2 7 MAR 2019 Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# SUK summer semester exams begin

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The summer semester examinations of the Shivaji University, Kolhapur (SUK) commenced from Tuesday across the division. According to varsity officials, as many as 640 exams will be conducted in the span of 56 working days in this semester exam. The number of days for the exam has increased due to the Lok Sabha elections.

Mahesh Kakade, Director of the Board of Examinations and Evaluation, SUK said, "The exam has begun from Tuesday with minor subjects, for repeaters as well as regular students. As the schedule progresses, the full-fledged exams will commence. The under-graduate examinations along with a few postgraduate subjects exams will start in the first phase."

Elaborating the schedule, the official added, "From Tuesday, exams of the BA, BCom and BSc courses have begun. Both regular and repeaters exams are being operated according to the schedule."

Kakade said that the system of sending an update of the student's presence or absence on SMS, which was implemented in the winter 2017 examination, will be continued this year as well. SUK officials had said that the system was created so that the post-examination disputes of the students could be addressed on the exam day itself, rather than seeing to it after the exam.

Meanwhile, Kakade said that the exam department has brought more conventional courses (BSc, BCom and BA), under the purview of the Secured Remote Paper Delivery (SRPD) system, under which the question papers are directly sent to the respective exam centre online in an encrypted format.

"In fact, on the first day of the exam, around 35 exam centres received the question papers via SRPD," he said.

The varsity, according to Kakade , is aiming to keep the examination duration under 50 days, as it did for the last few semester exams.

According to Kakade, for the exam, over 290 centres have been fixed across the Sangli, Satara and Kolhapur districts of the division.

"We are estimating that around three lakh students are expected to appear for this semester examination this year, in over 600 examinations," said Kakade.

The official further added that the SUK will continue with the 'No Supplement' policy in the March semester examination for all courses. Instead of the supplement, the SUK has increased the number of pages in an answer sheet to 40 and this will be applicable for all the courses.

The official added that for keeping a tab on the copying incidences, six flying squads have been appointed.

The SUK has an overall of 293 affiliated colleges across the Sangli, Satara and Kolhapur districts, with over 2.9 lakh students undertaking education in over 30 courses.